

## नवा जन्म

असे वाटते कधी कधी
सारेच जावे विरून,
दिवस संपतो तसा
जन्मही जावा सरून...!
जळून जावा कापसापरी
देह प्रपंच हा सारा,
राखेतूनी नव्याने
फुलुनी यावा सोनपिसारा...!
गांजलेल्या ह्या मनाला
एक परिसस्पर्श व्हावा,
अंधारल्या खाणीतून
अन् कोहिनूर प्रसवावा...!
वठलेल्या साऱ्या शाखा
मुळासवेच कोसळाव्या,
नव्या प्रवाहाला अन
नवा सागर गवसावा...!
व्हून सारे निखळावे
सारे शून्यवतच व्हावे,
दिव्य स्पर्शित होऊन
पुन्हा नव्याने जन्मावे...!

सोनाली

E 9 PRO MAX
MERA